# बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ माहे डिसेंबर २०१८

## आग्रीपाडा पोलीस ठाणे, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | **गु.र.क्र व कलम** | आग्रीपाडा पोलीस ठाणे गुरक्र.३३५/२०१८ कलम ३६३,३६८,३४ भादवि |
| २ | **गुन्हा घडला दिनांक** | दिनांक १६/१२/२०१८ रोजी १५.३० वा. ते १५.४५ वा. चे दरम्यान |
| ३ | **गुन्हयाचे ठिकाण** | भायखळा रेल्वे स्टेशनच्या पश्चिमेस, रेल्वे स्टेशन प्रवेशद्वाराजवळ, रूग्णवाहिका पार्क केल्याच्या ठिकाणी, भायखळा, मुंबई |
| ४ | **फिर्यादी** | श्रीमती शानु मैताब शेख वय २२ वर्षे |
| ५ | **बळीत** | फिर्यादी यांचा ०३ वर्षीय अल्पवयीन मुलगी |
| ६ | **गुन्हयातील चोरीस गेलेली मालमत्ता** | –– |
| ७ | **हस्तगत मालमत्ता** | –– |
| ८ | **आरोपी अटक** | १) सकिना बिलाल बिन उमर वय–२८ वर्षे<br>२) फातीमा बेगम अली बीन उमर वय ३९ वर्षे<br>**अटक दिनांक ०७/०८/१८ रोजी** |

आग्रीपाडा पोलीस ठाणे गुरक्र.३३५/२०१८ कलम ३६३,३६८,३४ भादवि या गुन्हयात दिनांक १६/१२/२०१८ रोजी १५.३० वा. ते १५.४५ वा. चे दरम्यान भायखळा रेल्वे स्टेशनच्या पश्चिमेस, रेल्वे स्टेशन प्रवेशद्वाराजवळ, रूग्णवाहिका पार्क केल्याच्या ठिकाणी, भायखळा, मुंबई याठिकाणी एक अंदाजे वय ४० वर्षे वयोगटातील महिला, एक ०८ वर्षीय मुलगा/मुलगी, व एक ०५ वर्षीय मुलगा/मुलगी यांनी आपआपसांत संगनमत करून फिर्यादी श्रीमती शानु मैताब शेख वय २२ वर्षे यांचे ०३ वर्षीय मुलीस फिर्यादींच्या ताब्यातुन पळवून नेले म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून दिनांक १६/१२/२०१८ रोजी आग्रीपाडा पोलीस ठाणे गुरक्र.३३५/२०१८ कलम ३६३,३६८,३४ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

आग्रीपाडा पोलीस ठाणेच्या पथकाने नमुद गुन्हयाची माहिती मिळताच गुन्हयाचा तपास सुरू केला. सदर पथकाने घटनास्थळाचे अत्यंत बारकाईने निरीक्षण केले. सदरची घटना भायखळा रेल्वे स्टेशन येथील असल्याने सदर पथकाने भायखळा रेल्वे स्टेशनवरील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता, दिनांक १६/१२/२०१८ रोजी १५.३० सुमारास एक बुरखा घातलेली महिला हि तिच्यासमवेत असलेल्या दोन मुलांसमवेत बळीत मुलीला घेवुन खोपोली फास्ट लोकलने भायखळा येथून निघाल्याचे फुटेज द्वारे निष्पन्न केले. सदरची माहीती प्राप्त होताच नमुद पथकाने तात्काळ आर.पी.एफ.च्या मदतीने दादर रेल्वे स्टेशन, ठाणे रेल्वे स्टेशन, कल्याण रेल्वे स्टेशन येथे पाहिजे आरोपीताच्या बद्दल संदेश पाठविला. नमुद संदेशाच्या अनुशंगाने कल्याण रेल्वे स्टेशन येथून आरोपी महीला ही कल्याण रेल्वे स्टेशन येथे प्लॅटफॉर्म क्र ०६ येथे उतरल्याचे सी.सी.टी.व्ही फुटेज मार्फतीने निष्पन्न झाल्याची माहीती प्राप्त झाली. त्याआधारे सदर पथकाने तात्काळ कल्याण रेल्वे स्टेशन येथे जावून सी.सी.टी.व्ही कॅमेऱ्याची अत्यंत बारकाईने पाहणी करता, नमुद फुटेजमध्ये पाहिजे महिला आरोपीत दिसून येत नव्हती. परंतु सदर पथकाने अथक प्रयत्नाने साधारण २२.४५ वा चे सुमारास कल्याण रेल्वे स्टेशन वरील सी.सी.टी.व्ही कॅमेऱ्यात आरोपी महिला ही तिच्या मुलांसमवेत बळित मुलीस घेवन कन्याकुमारी ट्रेनमध्ये शेवटच्या महीलांच्या बोगीत बसताना फुटेजच्या तपासणीत पाहिली. सदर पथकाने नमुद वेळी कन्याकुमारी ट्रेनचे लोकेशन पाहीले असता, कुर्डुवाडी रेल्वे स्टेशन च्या अलीकडे असल्याची माहिती प्राप्त झाली. सदर पथकाने नमुद माहीतीवरून तात्काळ कुर्डुवाडी रेल्वे स्टेशन येथील आर.पी.एफ व जी.आर.पी यांना घटनेची थोडक्यात माहिती देवून व आरोपीत महीलेचा तिच्या मुलांसह फुटेजद्वारे प्राप्त केलेला फोटा पाठवून कन्याकुमारी रेल्वेची शेवटची महीलांची बोगी तपासण्याबाबतचा संदेश प्रसारीत केला.

दिनांक १७/१२/२०१८ रोजी साधारण ०१.०० वा चे सुमारास कुर्डवाडी रेल्वे स्टेशन येथून आर.पी.एफ कडून माहीती प्राप्त झाली की, कन्याकुमारी रेल्वेच्या पाठीमागील महिलांची बोगी तपासली असता, तेथील प्रवाशांनी सांगीतले की, आरोपी महीला ही बळीत मुलीसह पुणे रेल्वे स्टेशन येथे उतरली. सदर माहितीच्या अनुषंगाने सदर पथकाने त्वरीत पुणे येथे जावून पुणे रेल्वे स्टेशन येथील सी.सी.टी.व्ही फुटेज पाहीले असता, पाहीजे आरोपी महीला हि बळीत मुलीस साधारण १९.४५ वा चे सुमारास कन्याकुमारी रेल्वे मधून उतरून पुणे रेल्वे स्टेशनच्या बाहेर पडताना दिसून आली. सदर पथकाने त्वरीत आरोपीत महीला जाण्याची शक्यता असलेल्या पुणे बस स्टॅंड येथील सीसीटीव्ही फुटेज, भुयारी मार्गातील सी.सी.टी.व्ही फुटेज, बंडगार्डन पोलीस ठाण्यातील सीटी सर्वेलन्सचे सी.सी.टी.व्ही कॅमेरे, तसेच पुणे आयुक्तालयातील सीटी सर्वेलन्सचे सी.सी.टी.व्ही कॅमेरे व रेल्वे स्टेशनचा आजुबाजुचा परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. परंतु सदर पथकास गुन्हा उघडकीस येण्याच्या दृष्टिने कोणतीही उपयुक्त अशी माहिती मिळाली नाही.

त्यानंतर आग्रीपाडा पोलीस ठाणेच्या पथकाने पाहिजे आरोपीबाबत पुणे येथील सर्व पोलीस ठाण्यांना पोलीस नियंत्रण कक्षाकडून संदेश प्रसारीत करण्यात आला. गुन्हा उघडकीस आणण्याची दृष्टीने अधिक माहिती मिळण्याकरिता भायखळा रेल्वे स्टेशन येथील सी.सी.टी.व्ही फुटेजची पुनः पुन्हा बारकाईने पाहणी केली असता, नमुद पाहिजे आरोपीत महीलेच्या हातात एक लाल व पांढऱ्या रंगांची प्लास्टीक कॅरी बॅग असल्याचे दिसून आले. सदर प्लास्टीक कॅरी बॅग वर कोणते नाव आहे याचा पूर्ण बोध होत नव्हता परंतू लाल पांढऱ्या वर्णनाच्या प्लास्टीक कॅरीबॅगचा शोध घेतला असता भायखळा पश्चिमेस लुट वन या शॉपची प्लास्टीक कॅरी बॅग ही आरोपीत महीलेच्या हातातील प्लास्टीक कॅरीबॅगशी मिळती जुळती असल्याचे निदर्शनास आले. सदर माहीतीवरून लुट वन शॉपमध्ये आरोपीताचे भायखळा रेल्वे स्टेशन येथील सी.सी.टी.व्ही फुटेज दाखवून चौकशी केली व शॉप लुट वन येथील सी.सी.टी.व्ही फुटेज तपासले असता आरोपीत महीलेने लुट वन शॉप मधून प्लास्टीक कॅरी बॅग घेतल्याचे दिसुन आले. लुट वन येथील इतर कर्मचाऱ्याकडे आरोपीत महीलेबाबत चौकशी केली असता तेथील कर्मचाऱ्याने आरोपीत महीलेने जवळील एस.टी.डी बुथवरून कॉल केल्याची माहीती दिली. सदर माहीतीवरून एस.टी.डी बुथ मालकाकडे आरोपीत महीलेचे छायाचीत्र दाखवून चौकशी केली असता एस.टी.डी बुथ मालकाने आरोपीत महीलेस ओळखले व सदर आरोपीत महीलेने हैद्राबाद येथे दिनांक १६/१२/२०१८ रोजी साधारण १४.३० वा चे सुमारास अंदाजे अर्धा तासाचा कॉल केल्याची माहीती दिली. सदर एस.टी.डी बुथ मालकाच्या माहितीवरून ए.टी.डी बुथचे दोनही क्रमांक प्राप्त करून सदर क्रमांकाचे सी.डी.आर मागवण्यात आले. सदर एस.टी.डी क्रमांकाचे सी.डी.आर प्राप्त करून कॉलची वेळ व कॉलची डयूरेशन यावरून एक संशयीत मोबाईल क्रमांक शोधण्यात आला. सदर प्राप्त झालेल्या मोबाईल क्रमांकाचा सी.डी.आर . एस.डी.आर मागण्यात आला असता तो हैद्राबादचा असल्याचेच समजुन आले. सदर संशयीत मोबाईल क्रमांकाचे सी.डी.आरचे तांत्रिक विश्लेषण करून पथक हैद्राबाद येथे रवाना झाले.

आग्रीपाडा पोलीस ठाणेच्या पथकाने हैद्राबाद येथे पोहचून संशयीत मोबाईलचे टॉवर लोकेशन प्राप्त केले. त्याआधारे सदर पथकाने स्थानीक पोलीस ठाणे सैफाबाद यांची मदत घेवून प्राप्त झालेल्या लोकेशनवर गेले असता, सदर ठिकाणी संशयीत मोबाईल धारक मिळून आला नाही. यावरून सदर पथकाने तेथील स्थानिक इसमास विश्वासात घेवून त्याच्या मोबाईल क्रमांकावरून संशयीत मोबाईल क्रमांकवर संपर्क केला असता, प्राप्त संशयीत मोबाईल क्रमांक हा रेश्मा या महीलेचा असल्याचे व सदर महीला ही एक बिल्डींगच्या टेरेसवर असल्याचे पथकाचे निदर्शनास आले. सदर पथकाने तात्काळ नमुद महीलेस स्थानीक पोलीस ठाण्याच्या मदतीने ताब्यात घेवून सैफाबाद पोलीस ठाण्यास आणले. सदर पथकाने सैफाबाद पोलीस ठाण्यात रेश्मा नामक महीलेकडे कसुन चौकशी केली असता, सदर गुन्हयातील पाहिजे महीला आरोपीत हि तिची नणंद असल्याचे सांगुन तिचे नावही सांगीतले. परंतू नमुद आरोपीत महीला हि सध्या कुठे आहे याबद्दल कोणतीही माहीती दिली नाही. ताब्यातील रेश्मा हिच्या सी.डी.आर विश्लेषण केले असता, तिचे मोस्ट कॉलर वरून तीची आई नामे ख्वाजा बी ही असल्याचे दिसुन आले. त्यावरून श्रीमती ख्वाजा बी यांना चौकशीसाठी ताब्यात घेवून सैफाबाद पोलीस ठाणे येथे आणले व कौशल्यपूर्ण

चौकशी केली असता महीला नामे ख्वाजा बी हिच्याकडून आरोपीत महिलेचा पती नामे बिलाल याचा मोबाईल क्रमांक प्राप्त झाला. सदर मोबाईल क्रमांकावर महीला नामे ख्वाजा बी यांना कोणतीही पोलीसा बाबतची माहीती न देण्याच्या अटीवर संपर्क साधण्यास सांगीतले. बिलाल याच्या मोबाईलवर संपर्क साधला असता समोरून आरोपीत महीला नामे सकीना ही बोलली त्यावेळी सकीना ही पुणे येथेच असल्याची माहीती सदर पथकास प्राप्त झाली. सदर पथकाने तात्काळ प्राप्त माहीती पोलीस ठाणे येथे संपर्क करून वरिष्ठांना दिली. यावरून एक पथक तात्काळ पुणे येथे रवाना झाले.

आग्रीपाडा पोलीस ठाणेच्या पथकाने श्रीमती ख्वाजी बी हिच्याकडे अधिक चौकशी केली असता, सदर महीलेने बळीत मुलीस त्यांची सुन नामे फातीमा ही घेवून गेल्याची माहिती दिली. तसेच सदर पथकाने ख्वाजा बी कडून फातिमाचा पत्ता प्राप्त करून तिला तिच्या राहत्या घरातून बळीत मुलीसह ताब्यात घेतले. सदर पथकाने नमुद गुन्हयाच्या तपासादरम्यान वेगवेगळया ठिकाण व मार्गावरील ३० पेक्षा जास्त सी.सी.टी.व्ही फुटेज तपासले.

आग्रीपाडा पोलीस ठाणेच्या पथकाने आग्रीपाडा पोलीस ठाणे, मुंबई चे पथकाने मानवी कौशल्य व तांत्रिक तपासाच्या आधारे अस्पष्ट दिसणाऱ्या प्लास्टीक कॅरीबॅग वरील शॉपचा शोध घेवून कौशल्यपूर्ण व कौशल्यपुर्ण चौकशी करून ०३ वर्षीय मुलीचे अपहरण करणाऱ्या महिला आरोपीस ताब्यात घेवून नमुद गुन्हयात अटक करून सदर गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरच्या गंभीर व संवेदनशील गुन्हयाची कौशल्याने उकल केल्याने **मा. पोलीस आयुक्तांनी त्यांना डिसेंबर –२०१८ चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ** अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोधाचे पारितोषिकाने सन्मानित केले आहे.

**आग्रीपाडा पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील पोलीस अधिकारी/अंमलदार**

| अ.क्र. | पोलीस अधिकारी/अंमलदार नांव | अ.क्र. | पोलीस अधिकारी/अंमलदार नांव |
|---|---|---|---|
| ०१ | वपोनि. सावळाराम गणपत आगवणे | ०७ | पोनाक्र.९६००१०/सचिन तुकाराम खानविलकर |
| ०२ | पोनि. जयदीप प्रकाश गायकवाड | ०८ | पोशिक्र. ०५०४३६/महादेव निवृत्ती गुरव |
| ०३ | सपोनि. नागेश अंबादास पुराणीक | ०९ | पोशिक्र.११०७९७/नागनाथ मल्लीनाथ भंडारकवठे |
| ०४ | पोउनि. अमित पंढरीनाथ बाबर | १० | पोशिक्र.०५०५७०/तुषार उदय पवार |
| ०५ | पोउनि. अर्जुन रामभाऊ कुदळे | ११ | मपोशिक्र.०९१२१२/रेश्मा सत्यवान सावंत |
| ०६ | सपोउनिक्र.८४६०/चंद्रकांत गुरूनाथ हौसनुर | १२ | पोशिक्र.०३६९४/अविनाश मधुकर चव्हाण |

--- ooo ---

## २) पंतनगर पोलीस ठाणे, मुंबई .

| | | |
|---|---|---|
| १ | **गु.र.क्र व कलम** | पंतनगर पोलीस ठाणे गुरक्र.५७१/२०१८ कलम ३०२,३६३,३६४,३६५,३९४, २०१, १२०(ब), ३४ भा.दं.वि. |
| २ | **गुन्हा घडला दिनांक** | दिनांक २८/११/१८ रोजी २१.१८ वा. चे सुमारास |
| ३ | **गुन्हयाचे ठिकाण** | विक्रोळी ट्रॅफिक चौकी समोरील कॉर्नर, ठाणे वाहिणी, पूर्व द्रुर्वगती महामार्गा लगत, घाटकोपर (पूर्व), मुंबई |
| ४ | **फिर्यादी** | श्री. रोनक राजेश्वर उदानी, वय–३१ वर्षे |
| ५ | **मयत** | फिर्यादी यांचे वडील श्री. राजेश्वर उदाणी, वय–५७ वर्षे |
| ६ | **गुन्हयातील चोरीस गेलेली मालमत्ता** | गळयात चावीच्या आकाराची पेन्डल असलेली चैन, उजव्या हाताचे करंगळीजवळील बोटामध्ये सात हिरे असलेली पांढऱ्या रंगाच्या सोन्याची अंगठी |
| ७ | **हस्तगत मालमत्ता** | गळयात चावीच्या आकाराची पेन्डल असलेली चैन, अंगठीमधील नऊ हिरे |
| ८ | **आरोपी अटक** | १) सचिन दिवाकर पवार, वय ३७ वर्षे,<br>२) प्रणित जोमा भोईर, वय २० वर्षे, |

| | | |
|---|---|---|
| | | ३) दिनेश दिलीप पवार, वय २५ वर्षे,<br>४) महेश प्रभाकर भोईर वय ३१ वर्षे,<br>५) शाईस्ता सरवर खान उर्फ डॉली, वय ४१ वर्षे,<br>६) निखत मोहमद उमर खान, उर्फ झारा, २० वर्षे<br>७) सिध्देश शंकर पाटील, वय २३ वर्षे<br>**अटक दिनांक ०८/१२/२०१८ ते दिनांक १२/१२/२०१८ पर्यंत रोजी ००.१५ वाजता.** |

पंतनगर पोलीस ठाणे गुरक्र.५७१/२०१८ कलम ३०२,३६३,३६४,३६५,३९४,२०१,१२०(ब), ३४ भा.दं.वि. या गुन्हयात दिनांक २८/११/१८ रोजी २१.१८ वा. चे सुमारास विक्रोळी ट्रॅफिक चौकी समोरील कॉर्नर, ठाणे वाहिणी, पूर्व द्रुर्वगती महामार्गा लगत, घाटकोपर (पूर्व), मुंबई याठिकाणी कोणीतरी अज्ञात इसमाने लबाडीने फुस लावून फिर्यादींचे वडीलांचे अपहरण केले म्हणुन गुन्हा कलम ३६३ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. परंतु नमूद गुन्हयाच्या तपासामध्ये अटक आरोपीतांनी फिर्यादी श्री. रोनक राजेश्वर उदानी, वय–३१ वर्षे यांचे वडील नामे राजेश्वर उदाणी, वय–५७ वर्षे यांचे अपहरण करुन सामाईक इरादयाने त्यांचा खुन करुन त्यांचे अंगावरील दागिने व मोबाईल हिसकावून घेवून त्यांचा मृतदेह पनवेल येथील जंगलात नष्ट करण्याच्या हेतूने टाकून दिल्याचे निष्पन्न झाल्याने दिनांक ०३/१२/२०१८ रोजी गुन्हा कलम ३६३, ३६४, ३६५,३०२,३९४,२०१,१२०(ब), ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

पंतनगर पोलीस ठाणे चे पथकाने नमुद गुन्हयाची माहिती मिळताच गुन्हयाचा तपास सुरू केला. पंतनगर पोलीस ठाणे येथे दाखल ह.मो.व्य.र.क्र १९६/२०१८ च्या अनुषंगाने सदर पथकाने राजेश्वर उदाणी यांचा चालक विजय मिसाळ याचेकडे चौकशी करता, त्याने राजेश्वर उदाणी यांना घाटकोपर पूर्व येथील विक्रोळी ट्राफीक चौकी मुलूंडकडे जाणाऱ्या कॉर्नरवर सोडल्याचे व ते एका सफेद गाडी मध्ये बसून वाशीकडे गेल्याचे सांगीतले. त्यानंतर राजेश्वर उदाणी यांचा मोबाईल क्रमांकाचा सीडीआर काढला असता, लास्ट लोकेशन ऐरोली येथील येत असल्याने घाटकोपर ब्रीज ते ऐरोली पर्यतच्या रस्त्यावरील सीसीटीव्ही फुटेज, हॉटेल, हॉस्पीटल तपासणी करण्यात आली.

दिनांक २९/११/२०१८ ते दिनांक ०२/१२/२०१८ या कालावधीत फिर्यादीच्या वडीलांनी कोणाशीही संपर्क न केल्याने व त्यांचे दोन्ही मोबाईल क्रमांक बंद येत असल्याने त्यांचे वडील नामे श्री.राजेश्वर उदाणी, वय–५७ वर्षे यांना कोणीतरी अज्ञात इसमाने लबाडीने फुस लावून त्यांचे अपहरण केले म्हणुन गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचे तपासाकरीता वरिष्ठांचे आदेशान्वये परिमंडळातील निष्णात अधिकारी व अंमलदार यांचे पथके तयार करण्यात आली.

सदर पथकाने सीसीटीव्ही फुटेज तपासणी, सीडीआर विश्लेषण याकरीता वेगवेगळी पथके तयार करून फिर्यादीचे नातेवाईक, ऑफीस स्टॉफ, मित्र याच्याकडे चौकशी करणे याकरीता वेगवेगळी पथके तयार करण्यात आली. अपहरण झालेल्या व्यक्तीस आलेल्या व त्यांनी केलेल्या मोबाईल कॉलबाबत मोबाईल धारकांची चौकशी चालू करण्यात आली.

सदर पथकास त्याप्रमाणे अपहृत व्यक्तीचा शोध घेत असताना पनवेल तालूका पोलीस ठाणे येथे एक बेवारस मृतदेह मिळालेला आहे अशी माहिती मिळाली. त्याप्रमाणे सदर पथकाने फिर्यादीसह नवी मुंबई महानगर पालीका रुग्णालय, वाशी येथे जावून पनवेल तालूका पोलीस ठाणे अपमृत्यु क्रमांक ६७/१८ मधील मयताचे प्रेत फिर्यादींना दाखविले असता, प्रेत कुजलेले असल्याने बॉडी स्ट्रक्चरवरुन ते प्रेत त्यांच्या वडीलांचे असावे असे त्यांना वाटले परंतू नक्की खात्री करता आली नाही असे पथकास सांगीतले. परंतू फिर्यादी यांना अपमृत्यु प्रकरणातील मयताचे राखून ठेवलेले कपडे फिर्यादीस दाखविले असता, त्यांनी ते कपडे व चप्पल व बेल्ट पाहून सदरचा मृतदेह त्याचे वडील राजेश्वर किशोरकुमार उदाणी (अपहरण झालेली व्यक्ती) असल्याचे सांगीतले. यावरुन सदर अपहरण झाले व्यक्तीचे कट रचून अपहरण करुन खुन करुन पुरावा नष्ट करण्यासाठी प्रेत पनवेल तालूका

पोलीस ठाणे हद्दीत जंगलात फेकून दिल्याने फिर्यादी यांचा पुरवणी जबाब नोंदवून सदर गुन्हयामध्ये कलम३६४, ३६५, ३०२, ३९४, २०१, १२०(ब), ३४ भा.दं.वि. प्रमाणे वाढ करण्यात आली.

सदर पथकाने नमुद गुन्हयाचा तपास शिघ्र गतीने करुन मृत व्यक्तीचे ज्या दिवशी अपहरण झाले त्या दिवशीच्या कॉल डिटेल्सचा अभ्यास करुन संपर्कात असलेल्या व्यक्तींकडे चौकशी करण्यास सुरवात केली. यापैकी सचिन पवार याचा शोध घेण्यात आला परंतू तो गुवाहटी येथे गेला असल्याची माहिती प्राप्त झाल्याने एक पथक गुवाहटी येथे रवाना झाले. सदर पथकाने प्राप्त माहितीच्या आधारे नमुद आरोपी क्र. १) सचिन दिवाकर पवार वय ३७ वर्षे पाठवून यास ताब्यात घेवून चौकशीकामी पोलीस ठाणेस आणण्यात आणले. या दरम्यान सचिन पवार याच्याकडे काम करणारा इसम नामे राजेश येद्रे याच्याकडे सपोनि पोरे यांनी केलेल्या चौकशीमध्ये सचिन पवार यांनी त्याला मोटर कारची नंबर प्लेट बनवुन पनवेल येथे देण्यास सांगीतल्याची माहीती दिल्याने सचिन पवार याच्याबाबत संशय बळावला त्यांनतर सचिन पवार याच्याकडे केलेल्या कौशल्यपुर्वक चौकशीत त्याने दिनेश पवार या ओळखीच्या निलंबित पोलीस शिपायाच्या मदतीने त्याच्या ओळखीच्या दोन महीलांना सोबत घेवुन सदरचा कट रचुन राजेश्वर उदाणी यांचा खुन केल्याचे सांगीतले. दिनेश पवार हा त्यावेळी पंतनगर पोलीस ठाणेच्या बलात्कारच्या गुन्हयात दि.०६/१२/२०१८ रोजी अटक असल्याने त्याचेकडे केलेल्या चौकशीत त्याने सदरच्या गुन्हयाची कबुली दिल्याने त्याचा नमूद गुन्हयात ताबा घेवुन त्याच्याकडे नमुद गुन्हयाबाबत केलेल्या चौकशीमध्ये आणखी ३ साथीदारांचा सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांचा शोध घेवुन त्यांना नमुद गुन्हयामध्ये अटक करण्यात आली.

सदर पथकाने आरोपींकडे चौकशी करून त्यांनी गुन्हयामध्ये वापरलेली आय टेन मोटर कार, स्कोडा मोटर कार व बुलेट अशी ३ वाहने, मृताच्या अंगावरील जबरीने काढून घेतलेली सोन्याची चैन व ०९ हिरे याशिवाय गुन्हयाचा कट रचताना, कट कार्यान्वीत करताना तसेच कट यशस्वी केल्यानंतर पुरावा नष्ट करताना आरोपींनी आपआपसात संपर्क साधण्याकरीता तसेच साक्षीदार यांच्याशी संभाषण तसेच व्हाटस्ॲप मेसेज पाठविण्याकरीता वापरलेले १५ हुन अधिक मोबाईल फोन हस्तगत करण्यात आले. नमुद गुन्हा उघडकीस आणण्याकरीता तसेच गुन्हयाच्या तपासाकरीता पुरावा प्राप्त करण्याकरीता २८ हुन अधिक ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासुन ते तपासकामी प्राप्त करण्यात आले आहे.

पंतनगर पोलीस ठाणेच्या पथकाने नमुद गुन्हा हा सामाजीक दुष्टया संवेदनशील असल्याने, तसेच यामध्ये एकुण ७ आरोपींचा सहभाग, कट रचने, कट अंमलात आणणे, पुरावे नष्ट करणे याकरीता ५ हुन अधिक घटनास्थळे, वापरलेली वेगवेगळी वाहने यासर्वाची सांगड घालुन वेगवेगळया पथकांच्या मार्फतीने तपासाची पारंपारीक कौशल्ये तसेच तांत्रीक बाबींचा उपयोग करून गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरच्या गंभीर व संवेदनशील गुन्हयाची कौशल्याने उकल केल्याने **मा. पोलीस आयुक्तांनी त्यांना डिसेंबर –२०१८ चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ** अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोधाचे पारितोषिकाने सन्मानित केले आहे.

**पंतनगर पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील पोलीस अधिकारी/अंमलदार**

| अ.क्र. | पोलीस अधिकारी/अंमलदार नांव | अ.क्र. | पोलीस अधिकारी/अंमलदार नांव |
|---|---|---|---|
| १ | पो.नि. लता दत्तात्रय सुतार | ८ | पोउनि. राहूल रामदास वाघमारे |
| २ | पो.नि. जितेंद्र सिताराम सोनवणे | ९ | पोउनि. अमित अशोकराव यादव |
| ३ | पो.नि. प्रताप गंगाराम भोसले | १० | पोउनि. अमोघ अशोक आंबवणे |
| ४ | सपोनि. अविनाश पांडुरंग पोरे | ११ | पोहक्र.२०२४०/संजय गणपत परब |
| ५ | सपोनि. विजय भिमराव सांडभोर | १२ | पोनाक्र.२०२४०/संजय सुखलाल आव्हाड |
| ६ | सपोनि. सचिन विठठ्ल कदम | १३ | पोशिक्र.०६१८९५/दिपक हरिभाऊ बेंडकुळे |
| ७ | सपोनि. संतोष महादेव कांबळे | –– | –– |